**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
**अर्थ खाते**
**जाक्र/अर्थ/भांडार/ ५८ /२०१९**
**दिनांक : २८/०१/२०१९**

**प्रति,**

१) ------------------------------------------------------------
२) ------------------------------------------------------------
३) ------------------------------------------------------------

**विषय :** अर्थसंकल्प पुस्तिका छपाईचे दर कळविणे बाबत.

वरिल विषयान्वये कळविण्यात येते की, नाशिक जिल्हा परिषदेची सन २०१८-२०१९ चा सुधारित व सन २०१९-२०२० चा मुळ अर्थसंकल्प पुस्तीका आपणाकडुन छपाई होणार असल्यास आपले प्रति नग छपाई दरपत्रक दिनांक २९/०१/२०१९ ते दिनांक ८/०२/२०१९ पावेतो कार्यालयीन वेळेत ५.०० वाजेपावेतो वित्त विभाग जिल्हा परिषद नाशिक कार्यालयात सादर करावीत. सदरचे दरपत्रक बंद पाकीटात पाठवावीत. पाकीटाच्या वरच्या बाजुस अर्थसंकल्प पुस्तीका छपाईसाठी दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. अर्थसंकल्प पुस्तीका तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) जिल्हा परिषद नाशिकची अर्थसंकल्प पुस्तीका नमुन्यानुसार छपाई करावयाची आहे. त्याचा नमुना कार्यालयात पहावयास मिळेल.
२) अर्थसंकल्प पुस्तीका छपाईसाठी लागणारी सर्व माहिती व अनुषंगिक कागदपत्र (हस्तलिखित) या कार्यालयाकडुन पुरविण्यात येईल. मात्र फोटो व जिल्हा परिषद सिम्बॉल पुरविण्यात येणार नाही.
३) अर्थसंकल्प पुस्तीका ही रंगीत तसेच मागील वर्षाच्या अर्थसंकल्प पुस्तीका प्रमाणे ठराविक नांवे बोल्ड अशी छपाई करावी लागेल. छपाईसाठी कलर कार्यालयाकडुन ठरविण्यात येईल.
४) अर्थसंकल्प पुस्तीका छपाई संख्या अंदाजित २५० नगाच्या मर्यादेत राहील.
५) अर्थसंकल्प पुस्तीका A-४ साईज छपाई करावी लागेल. छपाईसाठी ७० जीएसएम कागद व ८० ते ८५ पेजेस काळया रंगात छपाई आवश्यक आहे.
६) मागील वर्षाचा अर्थसंकल्प पुस्तीकाचा नमुना कार्यालयात समक्ष पहाता येईल.
७) अर्थसंकल्प पुस्तीका छपाई आदेशात दिल्यानुसार मुदतीचे आत छपाई करुन दयावी लागेल. व ती स्वखर्चाने कार्यालयात पोहोच कराव्या लागतील. साधारण किमान ३ दिवसात पुस्तिका छपाईचे बंधन राहिल.
८) नमुद दर हे सर्व करासहित राहतील.
९) नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.
१०) एका व्यक्तीस एक दरपत्रक सादर करता येईल.
११) दरपत्रक अंशता अथवा पुर्णता मंजुरी / नामंजुरीचे संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखुन ठेवले आहेत.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**प्रत,** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक
२/- वरिल प्रमाणे दरपत्रके मागविणेसाठी विभागाच्या वेफसाईटवरती टाकणेस सादर.